# पत्रवाचन -इतिहासाचे मुलभुत साधन

अभ्यास घटक (Modules)

**एम.ए.भाग-दोन :मराठी**

*प्रा. धोंडीराम जगन्नाथ दमामे*
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा
E-mail – drjaykardamame@gmail.com
Mob.-7580058959

इतिहासाची साधन :-

१)पत्र ,बखर- इत्यादी लिखित पुरावे

२)शिलालेख ,ताम्ब्रपत

३)नाणी ,मूर्ती

४)किल्ले ,लेणी ,समकालीन बांधकाम

५)भांडी ,वस्तू ,कपडे इत्यादी

# पत्र बोलते :-

इतिहासाचार्य राजवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे पत्राचा एक चीठोरा ,संपूर्ण बखारीची विश्वासार्हता ठरवत….

कारण पत्रलेखक स्वतः त्यावेळचा इतिहास सांगत असतो …. त्यामुळे पत्र वाचताना ,इतिहास शोधताना सामाकाळाची परिस्थिती समजून घेण गरजेच आहे

# लेखन प्रशस्ती :-

हेमाडपंतानी शके १२४० साली घालून दिलेली पद्धत पुढे यावनी राज्यामुळे मागे पडून नवीन फारसी मायाने आले. परंतु शिवाजी राजांनी राज्याभिषेकाच्या वेळी अनेक लष्करी ,मुलकी ,न्याय निवाड्या संबधी अनेक नवीन कायदे केले ,त्याला प्रशस्ती म्हणतात … यात लेखनप्रशस्ती म्हणून शिवाजी महाराजांनी बालाजी आवजी आणि बाकीच्या मुत्सद्यांच्या विचाराने ही रचली गेली …


यात अनेक पद्धती आहेत,कोणी कोणाला पत्र लिहिताना ,काय मायाने असावेत ,त्याची रचना कशी असावी याचा विचार केला आहे … एकूण ७८ प्रकारचे वेगवेगळे मायाने आहेत

**पत्रांचे मुलभूत २ प्रकार**

**१)खाजगी म्हणजेच घरगुती**
**२)सरकारी**

कोणी कोणास पत्र लिहिताना कसे लिहावे याचा विचार
प्रथम रेष ओढून मग लिहावयास सुरुवात करावी ,

किती रेषा कोणास ?
गुरूला ६
राजाला ५
मित्राला ३
सेवक,शत्रू २
पुत्र ,कन्यादी यांना १


पहिला रकाना
दफे
दफाते
दुसरा रकाना
कलें
महजर
तिसरा रकाना
चवथा रकाना
सर्बद् रेघ
दफे रेघ
दफाते रेघ
कलें रेघ
महजर रेघ
बाकि रेघ
अज रेघ
एकूणहत रेघ
वासलात रेघ
स रेघा
दुरेघी रेघा
दकांरी रेघ
दुरेघी दकांरी
पहिली जिल्हे
दुसरी जिल्हे

# पत्रांचे मायाने

१)शिवपूर्वकाळ (राज्याभिषेका अगोदर )

२)शिवकाळ (राज्याभिषेका नंतर )

३)पेशवे काळ

पत्राची भाषा :-

इतिहासाचार्यानी अभ्यास करून जो ठोकताळा मांडला तो असा आहे ,साधारण इसवी सन १६२८ पर्यंतच्या पत्रात १४% मराठी शब्द होते ,१६७७ पर्यंत याच प्रमाण ६२% इथपर्यंत गेलंनंतर १७२८ पर्यंत मराठी शब्दांच प्रमाण ९३% होत ज्या प्रदेशात मुसलमानी राज्य नव्हते तेथे मात्र मराठी अस्खलित आणि फारसी विरहित होती. (राजवाडे खंड ८ ,पान २५)

१)शिवपूर्व काळ :-

पत्रावर शिक्का

मायना

"अजरक्तखाणे " नाव " दामदौलत हू , बाजानैव कारकुनांनी ,देशापाड्यानी "प्रांत परगण्याचे नाव " बिदानाद सुहूर "सन “

शेवट :- मोर्तबसूद

रुजू निवीस,सूरनिवीस

XXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXX

अज:- निघालेले
रक्तखाना :- कार्यालय
बजानैव :- सांगितले
बीदानद :- जाणून घ्या
मोर्तबसूद:-अधिकाराने निघालेले

श्री. १६७४.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥

शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

अज् रख्तखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलेतहू. ता। बकाजी फर्जंद–सुहुरसन अर्बा सबैन व अलफ. मौजे नांदिडे तर्फ खडकवासलें येथील मोकदमी राजवडियाची होती. त्याणें सदोजी पोळ यासी निमे तक्षीम नावनांगराची विकिली. निमे तक्षीम कीर्दीची घुलियासी विकिली. त्यास सदोजी पोळापासून निमे नावनांगराची तक्षीम साहेबीं पैके देऊन विकत घेतली होती. ते हालीं तुह्मांस मेहेरबान होऊन शंभरा होनास विकत दिधली. निमे तक्षिमेचा हकलाजिमा व इनामचावर जें उत्पन्न असेल तें खाऊन नावनांगराची निमे पाटिलकीचा कारभार करीत जाणें. पाटिलकीची निमे तक्षीम तुज दिधली असे. लेकराचे लेकरीं औलाद अफलाद तुवा खाणें. अर्धाअर्धी कोणास संबंध नाहीं. साहेबीं निमे तक्षीम तुज दिधली असे. निमे काळी व पांढरी असे निमे तक्षीम आहे. ते तुसी तुज असे. मोर्तब सूद.

रुजू सुरनवीस.

मशरूल अनाम :- लोकमान्य
मशरूल हजरत :- राजमान्य

[ १२ ] श्री. २ एप्रिल १६६३.

मसुरल हजरती राजमान्य राजश्री मोरो त्रिमळ पेशवे व राजश्री निळो सोनदेऊ मजमूदार प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत–उपरि. साहेबीं कोंकणांत नामदार खानावरी जाण्याचा तह केला होता. ऐसी-यासी, हालीं किल्ले सिंहगडाहून समाचार आला आहे कीं गडावरी कांहीं फितवा जाला आहे. याबद्दल तूर्त कोंकणांत जाण्याचा तह राहिला. तरी तुह्मीं लष्करी लोकांनसीं व खासखेली हशमानसीं कागद देखतांच स्वार होऊन किल्ले सिंहगडास जाणें आणि किल्लियावरच हुशार खबरदार असणें. फितवा कोण कोण लोकीं केला होता हे खबर घेऊन हुजूर लेहून पाठवणें. मा। तान्हाजी नाईक व कोंडाजी नाईक व ++ ++ हडे व कमळोजी नाईक व दरेकर व रुमाजी अहिरा व गोंदजी पांढरा हे बराबरी घेऊन सिंहगडास जाऊन सिंहगडीं अल्गो अलगानीं बहुत खबरदार असणें. जे लोक किल्लियावरी मेदांत असतील ते हे आपल्या बराबरील लोक अलगेस ठेवणें. छ ४, माहे रमजान, सन सल्लास सितैन. मा। हुजूर. *

( मर्यादेयं )
( विराजते )

---

[ २९ ] १९ सप्तंबर १६७१.

शहरुल हजरत राजश्री धारराव निंबाळकर सुबेदार यांसी राजश्री शिवाजी राजे शहुरसन इसन्ने सबैन व अलफ. मा। माहादाजी यमाजी यासी मु + + + + + + + + + + + + + + काम फर्मावून पाठविले + + + + + + + + + + दरबार करीत जाणें + + + + + + + + + तिसालीना होन पा। १०० एकसे रास पादशाही मोकरर केले असेती. इ प पासून वजा वटाऊ रवेशप्रमाणें करीत जाऊन बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें. याविती व कागद बाटे लिहिलियामाफिक व शाही

[ २८ ] श्रीभवानी शंकर. १९ मे १६७३.

मशरुल अनाम राजश्री जुमलेदारानीं व हवालदारानीं व कारकुनानीं दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्ण ता। चिपळूण मामले दाभोळ प्रति राजश्री शिवाजी राजे सुा। अर्बा सबैन व अलफ. कसबे चिपळुणीं साहेबीं लष्कराची विले केली आणि याउपरि घाटावरी कटक जावें ऐसा मान नाहीं. ह्मणून एव्हां छावणीस रवाना केलें. ऐसीयास, चिपळुणी कटकाचा मुक्काम होता याकरितां दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणें पागेस सामा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणाआसपास विलातींत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां हाल कांहीं उरला नाहीं. ऐसें असतां वैशाखाचे वीस दिवस, उनाळा, हेहीं पागेस अधिक. बैठी पडली. परंतु जरूर जालें त्या करितां

शिवकाळ :- राज्याभिषेका नंतर

शिक्का

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक " x " "xxxxx" नामे संवत्सरे
"महिन्याचे नाव " " पक्ष " " तिथी " " वार " क्षत्रियकुलावतंस
श्रीराजा शिवछत्रपती याणी आज्ञा केली ऐसी जे

"मर्यादेय विराजते "

[ ४१ ]                    श्रीः                    ११ मे १६९०.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २६ प्रमोदिनाम संवत्सरे वैशाख शुद्ध चतुर्दशी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारोपंडित यांस आज्ञा केली ऐसी जे:— तुह्मी स्वामीच्या दर्शनाकारणें येत आहां. प्रस्तुत प्रभावळीस आलेस ह्मणोन कळों आलें. ऐसियास तुह्मी स्वामीचे दर्शनास आलेस उत्तम गोष्टी केली. तुमची स्वामीची भेटी सुमुहूर्ते व्हावी लागते. त्यास, उदईक दिनशुद्धी नाही आणि स्वामीही राजा-पुरास जाणेंकारणें प्रतिपदेस स्वार होऊन येत आहेत. तरी तुह्मी तेथेंच राहणें. स्वामीही येतील. तुमची व स्वामीची भेटी प्रभावळीसच होईल. तुह्मी यावयाची त्वरा न करणें. बहुत लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

[illegible]

प्रतिपच्चं
द्ररेखेव वर्धि
ष्णुर्विश्ववंदिता शाह
सूनोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

श्री

राजश्री विठोजी घाटगे गोसावी यांसी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य[ मो. जा.* ] प्रति राजश्री शिवाजीराजे उपरी तुम्ही पत्र पाठविलें तें पावले अभिप्राये कलो आला सरंजामीच्या कामाच्या गोष्टी कितेक लिहिल्या तरी जैसे काम कराल तैसे आम्हीहि बरें करून प्रस्तुत जरी आमचे सेवेस अंगीकार असाल तरी जे जमेती तुम्हापासी असेल ते घेऊन येणें भेटी घेणें भेटी नंतर तुमचा बरल्याख सरंजाम करून येविसी पहिलेच अभयपत्र पाठविले असे आताही हें अभय-पत्रच जाणून सीध्र येणे जमेत बरीं आणणे बरे घोडे, बरे माणूस पाहोन जे होईल ते ठेऊन फटकाल ठेवणार नाही कलले असावे मर्यां/देयं विराजते

[ पाठीवर शिवाजीचा अष्टकोनी शिक्का. *]

श्री

मो जा :- मोकळी जागा , हे मानाचे प्रतिक आहे

# पेशवे काळ :-

---

लें० २१
(४१७)

श. १६५३ चै. व.६
ता. १६-४-१७३१

श्री

सन ११४० फसली

फेरिस्त नं. ४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५७ विरोधिकृत नाम संवत्सरे चैत्र बहुल ६ भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपतीस्वामी यांनी राजश्री सुभानराव मोरे यांस आज्ञा केली ऐशी जे स्वामींची व चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांची भेट झाली. वारणेपासून तुंगभद्रा पावेतों मुलूख दरोबस्त देखील गड, कोट, ठाणीं त्यांजकडे दिली. किल्ले कोपल चिरंजीव राजश्री यांजकडे देविले असे. तरी त्यांचीं पत्रें घेऊन येतील त्यांच्या स्वाधीन कोपल किल्ला करणें जाणिजे. बहुत काय लिहिणें, " मोर्तब " ×

लेखांक [१७] श्री

१२८] [१ सितंबर १७५१]

राजश्री जयापा [सिंदे] गोसावी यासि.

आसिर्वाद उपरी. तुम्ही सविस्तर वृत राजश्री अताजी माणकेश्वर[५२] यासमागमे सागून पाठविल्याप्रा सर्व एकनिष्ठेचा व आपले बदोबस्ताचा अर्थ विदित केला तेणेकरून बहुत संतोष जाहला. सर्वविसी भरवसा तुमचा आहे. हर प्रकारे मल्हारबास आपले मायेत राखून तिकडील तहरह करून मोकले होणे. पूर्वी सविस्तर लिहून पाठविले आहेच. दसरा जाहलियावर सविस्तर अर्थ लिहिला जाईल. तुमचेविसी येथे तिळमात्र दुसरा अर्थ नाही. सर्व प्रकारे समाधान असो देणे. छ * २१ सवाल. ॥ बहुत काय लिहिणे हे आसिर्वाद.

ले. ७३

श्री

शके १६४३
इ. स. १७२१

० श्री । राजाशाहुनरप । तिहर्षनिधान बा ।
जीराव बलाल । मुख्य प्रधा । ना(६ ओळी,लंबवर्तुल, न उलटा)

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री बाजिराऊ पंडित प्रधान ता मोकदमानी मौजे बेलसर का सासवड सुा इसने अशरीन मया व अलफ सोनजी जगथापापासून नावजी व राणोजी मुले याणी रुपये ५० पनास व अडीच खंडी गला घेतला आहे धावययास खलेल करावयास लागला यास्तव तीर्थरूप—पत कैलासवासी याणी आज्ञापत्र सादर केले आहे परतु त्याचा भाग वारून दिल्हा नाही सोनजी साहेबकामावरी पडला आहे त्याच्या रुपयास व गल्यास खलेल करावयास गरज काये याउपरी तुम्ही ताकीद करून सदर रुपये व गला देवणे याउपरी हा .........मसाला होईल व रुपये गलाहि देविला.........समजोन रुपये गला सत्वर देवणे......वाल आज्ञा प्रमाण 'लेखन। सीमा' (गोल शिक्का)

ले. १२

श. १६२३ श्रा. वा ८

इ. स. १७०१ आगष्ट १६

राजेश्री बालाजी विस्वनाथ सर सुभेदार
कारकून प्रा। पुर्णे गोसावी यांसि

छ॥ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये — श्रो जयसिंग जाधवराऊ सेनापती दंडवत सुा इसने मया आलफ का। सासवड येथील कुलकर्णी व देसकुळकर्ण याचा कथळा आहे अबाजी त्रिंबक व कासी विस्वनाथ पुरंधरे यामधे व भगवत कासी अत्रे यांमधे गरगशा आहे यैसीयांस राजश्री सकराजीपंत संचीव यांही तुम्हास कागद दिल्हा आहे कीं गोतमुखे उभयेतानी आपळा निवाडा करून घ्यावा तरी उभयेता गोतांत जाऊंनू निवाडा करून घेतील तुम्हींहि धर्मता कोण्हाची रयात न करितां उभयेताचा निवाडा बरहक करणे छ २२ रबिलोवल हे* विनती

( ले. ६ प्रमाणें शिका व मोर्तब ).

राज. खं. ३ ले. १६७]                    [११ जाने १७२९

## " मीच तुमचा बाजीराव "

**[ भीवराव रेठरेकर या नांवाचा एक गृहस्थ बाळाजी विश्वनाथाचा ऋणानुबंधी व साह्यकर्ता असून, त्याला दोन मुलगे झाले, त्यांचीं नांवे बाजीराव व चिमणाजी अशींच ठेवण्यांत आलीं. बाजी भीवराव रेठरेकर बाजीराव पेशव्याचा भरंवशाचा सरदार होता. तारापुरच्या हल्ल्यांत तो मारला गेला, तेव्हां त्याच्या मातुःश्रीस पेशव्यानें पाठविलेलें पुढील सांत्वनपत्र मासलेवाईक आहे. ]**

गंगाजान्हवी समान मातुश्री वेणूबाई काकी वडिलाचे सेवेसी,—अपत्ये बाजीराव बल्लाळ साष्टाग नमस्कार वि॥ येथील ता॥ पौष वद्य १३ पावेतो स्वकीय लिहीत जाणे विशेष

पौष शुा ११ स तारापुरावर हल्ला केला ते समयी बाजी भीवराव तोडात गोळी लागून कैलासवासी जाहाले ईश्वरे मोठें अनुचित केले तुम्हास मोठा शोक प्राप्त जाला आमचा तर भाऊ गेला. त्यास, तुम्ही वडील दुःखाचे परिमार्जन करून विवेक करावा. त्याची मुले व चिमणाजी अप्पा आहेत, त्याचेहि त्याजपेक्षा अधिक चालेल परंतु आमचा भाऊ गेला बाजू गेली उपाय नाही त्यास, चिमणाजी भीवराव हे पाठविले आहेत, हे सागतील ते ऐकावे. साराश, मीच तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा मजवर दृष्टि द्यावी. बहुत काय लिहिणे, लोभ कीजे हे विनंति

---

ले. ५० }
[ ९९ ] }

{श. १६६८ वै. शु. ६
{ता १०-४-१७४६

श्री

राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसांवी यांसी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद सु॥ सीत आर्बेन मया व अलफ. राजश्री अर्जुनसिंग राजे हे बंगाल्याचे सालीं हुजूर आले त्यां तागायत हुजूरच आहेत. त्यास हे हुजूर आल्या आगोदर यांजकडे जागा होती ते जागा राजश्री सभासिंग याणीं हे हुजूर आले यास्तव झुंजून घेतली. यांचा कुंवर तेथें कामास आला. याप्रमाणें नाश जाहला. त्यास हे हुजूर आले होते कीं, पुढें कांहीं राज्य आपल्या जिमे करून घ्यावें, श्रम करावे, साहस करावें, कृपा संपादून घ्यावी. ऐसें असतां हे उमेद एकीकडेच राहोन यांची जागा होती ती जाऊन रहावयास स्थल नाहीं ऐसें जालें; आणि त्यांणीं तो एकनिष्ठा धरून बसले आहेत. ऐशास आमच्या विचारें ऐसें आहे जे, यांणीं आपल्या बऱ्याकारणें कश्यप* धरला, चार वर्षें जहालीं आणि यांची दाद न लागे. तेव्हां ही गोष्ट योग्य नांहीं. हें जाणून निकाल या प्रकारचा काढला आहे जे, हे हुजूर फिर्याद आले होते; त्या आगोदर यांजकडे गांव गव्हा ज्याप्रमाणें चालत आले आहेत त्याप्रमाणें चालवावें. अधिकही कांहीं देऊं नये, त्यांत उणें करूं नये. ये विशीं यंदा सभासिंग याजकडील तह सरकारचा होणें तो जहालियावरी सदर्हू प्रमाणें याची जागा यास द्यावयाचा करार करून याचे जिमे करावी. जाजती उपसर्ग लागों न द्यावा. याप्रमाणें खामखा करावें. कदाचित बुंधेले म्हणतील कीं, याची पुरातन जागा कांहीं नाहीं, ऐसे असतां काय म्हणून ते जागा द्यावी! तरि हे पुरातन आहेत म्हणोन द्यावी ऐसें नाहीं. हे सरकारांत आले त्या आगोदर यांजकडे जागा होती, त्यापासून यांजकडे चालत नाहीं. कजिया करितात. यास्तव हुजूर फिर्याद आल्या आगोदर यांजकडे होती त्याजप्रमाणें यांजकडे चालों देत तें करणें. या उपरी यांचें काम लांबणीवर न घालणें. हे बहुत येथें हैराण जहाले आहेत व यांची हैराण गत दूर होणें तें करणें. जाणिजे छ २९ रबिलोबल बहुत काय लिहिणें.

लेखन
सीमा

लेखांक [१०] श्री संवत * १८०८ ज्येष्ठ शुद्ध ९

[२२ मे १७५१]

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारो शंकर गोसावी यांसि.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरि. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणे विशेष तुम्हीं सरदारांस सामिल जालिया ता तुम्हांकडून पत्र येउन वर्तमान कळत नाहीं. हे गोष्ट उचित की काये. येदा सरदारानी फार अवगड मनसुबा केला होता. ईश्वरकृपेकरू [न] सिवीस जाउंन ईराण व तुराण रामेश्वर-पर्येंत लौकीक उतम जाहाला. ते येशस्वीच. तद्योगे सर्वही पार पडले. अतःपर वर्षाकाल आला. गंगापार जाउन मनसुबा करू म्हणतील तर त्यास पेच फार आहे. पलीकडे न जावे. तुम्हीं सर्वांनी पलीकडील मसलत न द्यावी. आटोपून देशास यावे. तुम्हीं आपले तालुकियात येउन बंदोबस्त करावा. उतम असें. मोठी हिमत मेहनत पलीकडे जाउन केली. हे वर्तमान श्रवण होउन संतोष जाहाला. तुमचे पत्र न आले हे बरे नव्हे. छ * ७ रजब. बहुत काये लिहिणे.

लेखन सीमा

---

[३८९] श्री. १५ ऑगस्ट १७५१.

पौ भाद्रपद शु ।। ८ शुक्रवार
शके १६७३. बा जासूद जोडी.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेसी :-

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. ऐशियास, सर्व प्रकारें भरंवसा स्नेहाचा रामदासपंताचा आहे. त्यांचे स्नेहानें बहुत किफायती आहेत. जन नानाप्रकारें बोलतात. परंतु त्यांचा आमचे ठिकाणीं निष्ठापूर्वक स्नेह व आमची कृपा त्यांचे ठायीं असतां, वरकडांच्यानें काय होणें ? तिळमात्र संशय न मानितां त्यांनीं आपले दौलतेचा बंदोबस्त करावा. जें त्यांचे हित आमचे कर्तव्यायोग्य असले तें आह्मांस घरोबियाचे रीतीनें त्याहावें. करावयास अंतर होणार आहीं. त्यांनीही आमचें हित तें करावें. गायकवाडाचे प्रसंगीं त्यांनी कुमक पाठविली, येणेंकरून वचनप्रामाणिकतेचा पुढें फार भरंवसा धरिला आहे. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

ले. ४७
[ ७९ ]

श. १६६७ ज्येष्ठ शु० १४
ता। २-६-१७४५

श्री

तीर्थरूप राजश्री नाना स्वामींचे सेवेशीं

आपत्ये सदोबानें साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ ता। छ १२* जमादिलोवल मुक्काम पुणें. स्वामींच्या आशीर्वादें करून यथास्थित असें विशेष.—स्वामी कोठें आहेत, माघारे फिरले न फिरले, कोणें जागा आले, हें कांहींच वर्तमान कळत नाहीं, तरि स्वामींनीं सविस्तर वर्तमान वरच्यावरि ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर आम्ही राजश्री+——स्वामींचा निरोप छ ३ जमादिलोवलीं घेऊन पुण्यास आलों. स्वामींस वर्तमान कळावें यास्तव लिहिलें असे. राजश्री बाबूजी नाईक यांस राजश्री स्वामींनीं कर्नाटकाचा मामला मुकासा सांगून गौरव केला. तो अर्थ विस्तारें स्वामींस लिहिलाच आहे, त्याजवरून विदित होईल. राजश्री आबाजी नाईक राजश्री स्वामींच्या दर्शनास गेले होते. त्यांस छ ५ जमादिलोवलीं राजश्री स्वामींनीं निरोप दिल्हा. वस्त्रें १ मंदील, १ महमुदीचा झगा, १ चादर मोराची. १ पदक हत्तीचा मजुरा दिल्हा.

येणें बहुमान करून आवुराव किताब देऊन निरोप दिल्हा. स्वामींस कळावें यास्तव लिहिले असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

---